# निशाण क्र. १०८ वरील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १८ यांचे नाव कमी करुन त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करणेबाबत दिलेला आहे. सदर प्रतिवादी क्र. १८ चंद्रभागा सहदेव आलव या दि. १९/०२/२०२२ रोजी मयत झाल्या असून त्यांचे वारस मुलगे प्रतिवादी क्र. १९ व २० हे याकामी दाव्याचे पक्षकार आहेत. सबब, प्रतिवादी क्र. १८ यांचे नाव दाव्यातून कमी करण्यात यावे व तशी दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती वादी यांनी केली आहे.

२. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे.

३. प्रतिवादी क्र. १८ चंद्रभागा सहदेव आलव या दि. १९/०२/२०२२ रोजी मयत झाल्या आहेत याबाबत वाद दिसून येत नाही. प्रतिवादी क्र. १८ यांना प्रतिवादी क्र. १९ व २० हेच वारस असल्याचे वादी यांनी पटलावर आणलेले आहे. त्यांचे व्यतिरीक्त इतर कोणी वारस असल्याचे वादी यांनी पटलावर आणलेले नाही. सबब अर्ज मंजूर करण्यात येत आहे. परिणामी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे:

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने आजपासून चौदा दिवसांचे आत दाव्यात दुरुस्ती करुन तशी दुरुस्ती प्रत याकामी हजर करणेची आहे.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by BALKRISHNA RAJARAM PATIL
Date: 2022.04.07 10:46:47 +0530

स्थळ: देवगड ( बी. आर. पाटील )

दिनांकः ०६/०४/२०२२ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.